# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


**परिपत्रक क्र. २८६/२०२४**

**विषय :** विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतील पीएच्.डी. विद्यार्थ्यांकरिता Research and Publication Ethics (RPE) या ०२ क्रेडीटच्या कोर्सबाबत ..

**संदर्भ :** १. विद्यापीठ परिपत्रक क्र. ६५/२०२० (शै.प्रवेश/७६२) दि.०३/०३/२०२०
२. विद्यापीठ परिपत्रक क्र. १०३/२०२१ (शै.प्रवेश/१८६६) दि. ०८/०४/२०२१
३. विद्यापीठ परिपत्रक क्र. १४८/२०२१ (सी.बी.एस./४३७) दि. २१/०५/२०२१

उपरोक्त संदर्भीय परिपत्रक क्र. २ अन्वये पीएच्.डी. साठी नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांकरिता Research and Publication Ethics (RPE) हा ०२ क्रेडीटचा कोर्स प्रस्तुत विद्यापीठाच्या सेंटर फॉर पब्लिकेशन इथिक्स येथेच करण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांनी संदर्भ परिपत्रक क्र. ३ अन्वये विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत Research and Publication Ethics (RPE) हा ०२ क्रेडीटचा कोर्स संबंधित संशोधन केंद्र अथवा सेंटर फॉर पब्लिकेशन इथिक्स येथे करता येईल, असे कळविण्यात आले होते.

उपरोक्त दोन्ही परिपत्रकाच्या अनुषंगाने विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतील पीएच्.डी. प्रवेशित विद्यार्थ्यांनी Research and Publication Ethics (RPE) ०२ क्रेडीटचा कोर्स संबंधित संशोधन केंद्र अथवा सेंटर फॉर पब्लिकेशन इथिक्स यापैकी कोठे करावा, याबाबत संदिग्धता निर्माण झाल्याने मा. प्राचार्य/संचालक, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतील संलग्नित संशोधन केंद्रे/परिसंस्था यांना कळविण्यात येते की, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतील पीएच्.डी. प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी Research and Publication Ethics (RPE) हा ०२ क्रेडीटचा कोर्स संबंधित संशोधन केंद्रास प्रस्तुत विद्यापीठाच्या सेंटर फॉर पब्लीकेशन इथिक्स या विभागाच्या सल्ल्याने व मार्गदर्शनाखाली आयोजित करता येईल.

कळावे,

गणेशखिंड, पुणे )
संदर्भ : शै. प्रवेश/ 3813 )
दिनांक : 29/11/2024 )

29/11/2024
(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

**प्रत:**

१. मा. प्राचार्य/संचालक, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतील सर्व मान्यताप्राप्त संस्था/संशोधन केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. संचालक, सेंटर फॉर पब्लीकेशन इथिक्स, प्रस्तुत विद्यापीठ.

D:\General Circulars\Course Work.docx